# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर



## परिपत्रक

वाचा : १) मा.संचालक राज्य प्रशासकीय व्यवसाय, शिक्षण संस्था, मुंबई यांचे पत्र दि. ०९/१२/२०२१ रोजीचे
२) उच्च शिक्षण, सोलापूर विभाग, सोलापूर यांचे जा.क्र. विससं/उशि/सोवि/वेतनपथक/२०२१/२२१३ दि.२८/१२/२०२१

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा पूर्व परीक्षा - २०२२ च्या पूर्व तयारीसाठी परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम - २०२२ या विनामूल्य प्रशिक्षणाकरिता ऑनलाईन पध्दतीने सामाईक प्रवेश परीक्षा (Common Entrance Test) रविवार, दि. १६/०१/२०२२ रोजी आयोजित करण्यात येणार आहे. सदरील परीक्षेसंबंधीच्या महत्त्वाच्या सूचना राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण, मुंबई यांच्या **www.siac.org.in** या संकेतस्थळावर देण्यात आलेल्या आहेत.

त्याअनुषंगाने जास्तीत जास्त पात्र विद्यार्थ्यांना नागरी सेवा पुर्व परीक्षा २०२२ करिताच्या प्रशिक्षण पुर्व प्रवेश परीक्षेत सहभाग घेण्यासाठी आवाहन करण्यात यावे. याबाबतची सूचना संकुलातील सर्व विद्यार्थ्यांच्या निर्दशनास आणून द्यावे. तसेच याकरिता नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांची एकत्रित माहिती मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग यांनी सादर करण्यासंदर्भात सूचित केले आहे. सबब, प्रशिक्षण पुर्व प्रवेश परीक्षेत नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांची माहिती डॉ. व्ही. पी. धुळप, समन्वयक, स्पर्धा परीक्षा केंद्र यांच्या **vpdhulap@sus.ac.in** या ई-मेलवर आणि कुलसचिव कार्यालयास **registrar@sus.ac.in** वर दि. १०/०१/२०२२ पर्यंत दु. ०१.०० वाजेपर्यंत खालीप्रमाणे विहित नमुन्यात पाठविण्यात यावे.

**संकुलाचे नाव : ---------------------------------------**

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | प्रवेशित वर्ग | मोबाईल क्रमांक | ई-मेल आयडी |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**आदेशावरुन,**

**(डॉ. सुरेश पवार)**
**प्र. कुलसचिव**

**जा. क्र. पुअहोसोविसो/कु.का./२०२२/६०**
**दिनांक : 3 JAN 2022**

**प्रति,**

१. मा. कुलगुरु कार्यालय
मा. प्र-कुलगुरु कार्यालय } माहितीस्तव

२. मा. सर्व संचालक, विद्यापीठ परिसर संकुले - योग्य त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित

# महाराष्ट्र शासन

## विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग, सोलापूर

ड विभाग, तळ मजला, प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर ४१३ ००१

E-mail: jtdirhesol@rediffmail.com


जा.क्र. : शिससं/उशि/सोवि/२०२१/ 2160 दिनांक :22/१२/२०२१

## : प्रेस नोट :

## सामायिक प्रवेश परीक्षा २०२२

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा पूर्व परीक्षा २०२२ करिता पुर्व प्रशिक्षणासाठी राज्यातील राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई व भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, नागपूर, अमरावती, औरंगाबाद, कोल्हापूर व नासिक या ६ केंद्रातील प्रवेशासाठी विनामुल्य प्रशिक्षणाकरिता ऑनलाईन पध्दतीने सामायिक प्रवेश परीक्षा (सीईटी) रविवार, दि.१६.१.२०२२ वेळ सकाळी ११.०० ते १.०० या वेळात घेण्यात येईल. सामायिक प्रवेश परीक्षा २०२२ च्या अनुषंगाने प्रवेश परीक्षा कार्यक्रम, प्रशिक्षण २०२२ साठी एकूण प्रवेश क्षमता, प्रवेश परीक्षा पध्दत, शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा, अधिवास, वसतिगृह व्यवस्था व विदया वेतन, प्रवेश शुल्क, प्रवेशा संबंधीच्या महत्वाच्या सूचना राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण, मुंबई यांच्या www.siac.org.in या संकेतस्थळावर देण्यात आलेल्या आहेत. त्या अनुषंगाने मा.डॉ.अशोक उबाळे, विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग, सोलापूर यांच्या वतीने सोलापूर जिल्हयातील जास्तीत जास्त पात्र विदयार्थ्यांना नागरी सेवा पुर्व परीक्षा २०२२ करिताच्या प्रशिक्षण पुर्व प्रवेश परीक्षेत सहभाग घेण्यासाठी आवाहन करण्यात येत आहे.

(डॉ.अशोक उबाळे)<br>
विभागीय सहसंचालक (उ.शि.)<br>
सोलापूर विभाग, सोलापूर.

महाराष्ट्र शासन
विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण,
सोलापूर विभाग, सोलापूर
ड, विभाग, तळमजला, प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर- 413001

दूरध्वनी क्र. 0217-2324055 E-mail - jtdirhesol@rediffmail.com

जा. क्र. : विससं/उशि/सोवि/वेतनपथक/भनिनि/2021/2213 दि. 28/12/2021

प्रति,

1. मा. कुलसचिव,
   पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापू
2. प्रचार्य,
   सर्व अशासकीय अनुदानित, विना अनुदानित, कायम विनाअनुदानित
   कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व अध्यापक महाविद्यालये, सोलापूर विभाग

विषय : केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा पूर्व परीक्षा 2022 च्या पूर्व तयारीसाठी सामायिक पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम – 2022

संदर्भ : 1) मा. संचालक, राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई यांचे पत्र दि.09.12.2021
2) या कार्यालयाचे पत्र क्र. शिससं/उशि/सोवि/2021/2161, दि. 22.12.2021
3) या कार्यालयाचे पत्र क्र. विससं/उशि/सोवि/2021/2209, दि. 28.12.2021

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा पूर्व परीक्षा 2022 च्या पूर्व तयारीसाठी सामायिक प्रवेश परीक्षा दि.16.01.2022 रोजी आयोजित करण्यात आलेली आहे. यासंदर्भात आपल्या महाविद्यालयातील पात्र विद्यार्थ्यांना नमूद परिक्षेबाबत माहिती व्हावी, तसेच जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवावा, याबाबत आपणास या कार्यालयाचे संदर्भांकित पत्रान्वये कळविण्यात आलेले होते.

त्याअनुषंगाने गुगल मीट वर आज, दि.28.12.2021 रोजी दुपारी 03.00 वा. सर्व प्राचार्यांचे आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आलेले होते. या बैठकीत देण्यात आलेल्या सुचनांनुसार आपल्या महाविद्यालयातील जास्तीत जास्त पात्र विद्यार्थ्यांकडून सदर परिक्षेसाठी दि.09.12.2021 पासून नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांची माहिती या कार्यालयास तात्काळ सादर करण्यात यावी. तसेच दि. 07.01.2022 ही अर्ज करण्याची अंतिम मुदत असून, जास्तीत जास्त विद्यार्थ्यांचे नोंदणी होणेबाबत महाविद्यालय / विद्यापीठ स्तरावरुन प्रयत्न करण्यात यावेत.

सोबत यापूर्वी पाठविलेले संदर्भांकित पत्रे सुलभ संदर्भासाठी संलग्नीत आहेत. तरी याप्रमाणे कार्यवाही करुन त्याचा अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा

विभागीय सहसंचालक
उच्च शिक्षण
सोलापूर विभाग, सोलापूर

सोबत- वरीलप्रमाणे

प्रत- मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-1, यांना माहितीस्तव सविनय सादर

# महाराष्ट्र शासन

## विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग, सोलापूर

ड विभाग, तळ मजला, प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर ४१३ ००१
E-mail: jtdirhesol@rediffmail.com

जा.क्र. : शिससं/उशि/सोवि/२०२१/ 2161 दिनांक : २२/१२/२०२१

प्रति,

१. मा.कुलसचिव,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विदयापीठ, सोलापूर.

२. प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित विना / कायम विना अनुदानित कला, वाणिज्य,
विज्ञान, विधी व अध्यापक महाविद्यालये, सोलापूर विभाग

विषय : केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा पूर्व परीक्षा २०२२ च्या पूर्व तयारीसाठी सामायिक पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम – २०२२

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा पूर्व परीक्षा २०२२ च्या पूर्व तयारीसाठी सामायिक प्रवेश परीक्षा दि.१६.१.२०२२ रोजी आयोजित करण्यात आलेली आहे. यासंदर्भात सोलापूर जिल्हयातील पात्र विदयार्थ्यांना माहिती व्हावी, यासाठी प्रेस नोट व जाहिरात तयार करण्यात आलेली असून ती यासोबत जोडली आहे.

सदरची प्रेस नोट व जाहिरात विदयापीठाच्या / महाविदयालयाच्या नोटीस बोर्डवर लावण्यात यावी. तसेच जास्तीत जास्त विदयार्थ्यांच्या निदर्शनास येईल अशा रितीने कार्यवाही करावी.

(डॉ.अशोक उबाळे)
विभागीय सहसंचालक (उ.शि.)
सोलापूर विभाग, सोलापूर.

महाराष्ट्र शासन

# राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था (SIAC), मुंबई

( प्रि-आय.ए.एस. ट्रेनिंग सेंटर, नागपूर, अमरावती, औरंगाबाद, कोल्हापूर व नाशिक )
हजारीमल सोमाणी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस् समोर, मुंबई - ४०० ००१
Tel. No: 022-22070942, web: www.siac.org.in, e-mail:siac1915@gmail.com

## जाहिरात

## सामाईक प्रवेश परीक्षा - २०२२

### UPSC - नागरी सेवा परीक्षा, २०२२ च्या पूर्व तयारीसाठी परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम - २०२२

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (UPSC CIVIL SERVICES EXAMINATION for IAS/IPS/IFS/ IRS, etc.) नागरी सेवा पूर्व परीक्षा २०२२ करीता पूर्व प्रशिक्षणसाठी राज्यातील राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई व भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, नागपूर, अमरावती, औरंगाबाद, कोल्हापूर व नाशिक या सहा केंद्रातील प्रवेशासाठी विनामूल्य प्रशिक्षणकरीता ऑनलाईन पद्वतीने सामाईक प्रवेश परीक्षा (Common Entrance Test) रविवार, दि. १६/०१/२०२२, वेळ सकाळी ११.०० ते १.०० या वेळात घेण्यात येईल.

**प्रवेश परीक्षा कार्यक्रम:**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | ऑनलाईन अर्ज सुरुवात | दि. ०९/१२/२०२१ | गुरुवार | सकाळी १०.०० पासून |
| २ | अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक | दि. ०७/०१/२०२२ | शुक्रवार | रात्री १२.०० पर्यत |
| ३ | फी भरण्याचा अंतिम दिनांक | दि. ०९/०१/२०२२ | रविवार | सायं. ५.०० पर्यत |
| ४ | अभिरुप चाचणी (Mock Test ) | दि. १२/०१/२०२२ | बुधवार | सकाळी ११.०० ते १.०० पर्यंत |
| ५ | सामाईक ऑनलाईन प्रवेश परीक्षा | दि. १६/०१/२०२२ | रविवार | सकाळी ११.०० ते दु. १.०० पर्यंत |
| ६ | परीक्षा निकाल | दि. २०/०१/२०२२ | गुरुवार | सायं. ५.०० वाजता |

मुलाखतीचा कार्यक्रम परीक्षेच्या निकालानंतर संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

**प्रशिक्षण कार्यक्रम २०२२ साठी एकूण प्रवेश क्षमता-**

| अ. क्र. | प्रशिक्षण केंद्रांचे नाव | केंद्रातील प्रवेश क्षमता | बार्टी अनुदानीत | अल्पसंख्याक अनुदानीत | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई | १०० | १० | १० | १२० |
| २ | भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, नागपूर | १०० | १० | १० | १२० |
| ३ | भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, औरंगाबाद | ६० | १० | १० | ८० |
| ४ | भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, कोल्हापूर | ६० | १० | १० | ८० |
| ५ | भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक | ६० | १० | - | ७० |
| ६ | भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, अमरावती | ६० | १० | - | ७० |
| | एकूण | ४४० | ६० | ४० | ५४० |

बार्टी व अल्पसंख्यांक अनुदानित उमेदवार वगळुन उर्वरीत उमेदवारांना शासन नियमाप्रमाणे शैक्षणिक व सामाजिक आरक्षण लागु राहिल.

**प्रवेश परीक्षा पध्दत:-**

ऑनलाईन परीक्षा २०० गुण व मुलाखत ५० गुण अश्याप्रकारे सामाईक प्रवेश परीक्षा एकूण २५० गुणांची राहील. ऑनलाईन सामाईक प्रवेश परीक्षा केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणा-या नागरी सेवा पूर्व परीक्षेच्या धर्तीवर (नागरी सेवा पूर्व परीक्षा-२०२२ च्या अभ्यासक्रमाप्रमाणे ) घेण्यात येईल. नागरी सेवा पूर्व परीक्षेचा पेपर I व पेपर II स्वतंत्र न घेता एकाच प्रश्नपत्रिकेत ( भाग I व भाग II) या प्रमाणे विभागणी करण्यात येईल. त्यात सामान्य अध्ययन भाग I (५० प्रश्न/१०० गुणांचा) व भाग II (कलमापन चाचणी - CSAT) (४० प्रश्न/१०० गुणांचा) राहील.

| विषय | प्रश्नांची संख्या | एकूण गुण | माध्यम | परीक्षेचा कालावधी | परीक्षेचे स्वरूप |
|---|---|---|---|---|---|
| SECTION-I सामान्य अध्ययन - I | ५० | १०० | HINDI AND ENGLISH | सकाळी - ११.०० ते दु. १.०० वाजेपर्यंत एकूण वेळ: २ तास | वस्तुनिष्ठ Objective Type (MCQ) Negative Marking - One-third (०.३३%) of the marks assigned to the question |
| SECTION-II सामान्य अध्ययन - II (CSAT) | ४० | १०० | HINDI AND ENGLISH | | |
| अभिरुप मुलाखत | | ५० | MARATHI HINDI AND ENGLISH | मुलाखतीचे कार्यक्रम परीक्षेनंतर कळविण्यात येईल | |

- सामान्य अध्ययन SECTION-II (CSAT) हा Qualifying Section असल्याने किमान ३३% म्हणजे १०० गुणांपैकी ३३ गुण असणे अनिवार्य आहे.
- UPSC नागरी सेवा (पूर्व) परीक्षेनुसार गुणवत्ता यादी SECTION-I (सामान्य अध्ययन) या भागातील गुणांवर व मुलाखत मध्ये मिळालेल्या एकूण गुणांच्या आधारीत असेल.

गुणवत्ता यादीप्रमाणे शासकीय नियमांच्या अधिन राहून विदयार्थ्यांना त्यांनी निवडलेल्या प्रशिक्षण केंद्रात प्रवेश देण्यात येईल. प्रवेशासाठी दिलेले प्रशिक्षण केंद्र कोणत्याही परिस्थितीत बदलता येणार नाही.

**शैक्षणिक पात्रता:-**

उमेदवार हा कोणत्याही मान्यता प्राप्त विद्यापीठाचा पदवीधर असावा. जे उमेदवार पदवी अभ्यासक्रमाच्या शेवटच्या वर्षामध्ये शिक्षण घेत आहेत व ज्यांचे निकाल प्रलंबित आहे , अशा उमेदवारांनी प्रवेशाच्या वेळी स्थांनातरण प्रमाणपत्र देणे बंधनकारक राहिल.

**वयोमर्यादा:-** (दि.१ ऑगस्ट २०२२ रोजी)

१) वय -२१ ते ३२ वर्षे (खुला संवर्ग//EWS )

२) वय - २१ ते ३५ वर्षे ( इ.मा.व./वि.मा./वि.जा./भ.ज. )

३) वय - २१ ते ३७ वर्षे (अनु. जाती/जमाती )

**अधिवास:-**

उमेदवार महाराष्ट्राचा रहीवाशी (Domicile of Maharashtra) असावा अथवा शा.नि. मकसी-१००७/प्र.क्र.३६/का.३६ दिनांक १० जुलै २००८ नुसार महाराष्ट्र-कर्नाटक वादग्रस्त सीमा भागातील असल्यास उमेदवाराने अर्जात उमेदवार पात्रता परीक्षा महाराष्ट्र-कर्नाटक वादग्रस्त सीमा भागातील निर्देशित गाव किंवा शहरातील संस्थेमधून उत्तीर्ण झाल्याचे नमूद करणे आवश्यक असेल. तसेच अर्जा सोबत प्रवेशाच्या वेळी संबंधित उमेदवारानी त्यांच्या पालकांचे महाराष्ट्र-कर्नाटक वादग्रस्त सीमा भागातील रहीवासी असल्याचे जिल्हाधिकारी यांचे प्रमाणपत्र, तसेच उमेदवाराची मातृभाषा मराठी असल्याचे संस्थेच्या प्राचार्यांचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. तसेच १०वी ची परीक्षा मराठी विषय घेऊन उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

**वसतीगृह व्यवस्था व विद्यावेतन :-**

शासनाच्या परवानगीने ऑफलाईन प्रशिक्षण वर्ग सुरु करण्याचे निर्देश प्राप्त झाल्यास अल्पसंख्यांक, बार्टी व स्थानिक रहिवासी वगळून इतर उमेदवारांना गुणांनुक्रमे उपलब्धतेनुसार वसतिगृहाची सुविधा देण्यात येईल. प्रवेशित विद्यार्थ्यांना मासिक विद्यावेतन शासन निर्णयानुसार व शासनाने वेळोवेळी दिलेल्या सुचनेनुसार देण्यात येईल.

**प्रवेश शुल्क:-**

**१) खुला प्रवर्ग (सर्वसाधारण) :-** रु. ५००/-

**२) मागास प्रवर्ग :-** रु. २५०/- ( इ.मा.व./वि.मा./वि.जा./भ.ज./ EWS/ अनु. जाती/जमाती )

प्रवेश शुल्क भरणा ऑनलाईन पध्दतीनेच करावा लागेल.

**प्रवेशासंबंधी महत्वाच्या सुचना:**

१) उमेदवाराने अर्जामध्ये सहा प्रशिक्षण केंद्रापैकी कोणतेही एक केंद्र निवडणे अनिवार्य आहे. एकदा निवडलेल्या केंद्रामध्ये बदल करता येणार नाही.

२) **एस.आय.ए.सी., मुंबई व महाराष्ट्रातील इतर भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व केंद्रांमध्ये पूर्व परीक्षा प्रशिक्षण सत्राचा लाभ घेतलेल्या माजी विद्यार्थ्यांना त्याच केंद्राकरीता अर्ज करता येणार नाही.**

३) प्रवेश परीक्षा अर्ज ऑनलाईन असल्याने कोणतेही शैक्षणिक प्रमाणपत्र या कार्यालयात पाठविण्यात येऊ नये. प्रमाणपत्रांची पडताळणी प्रत्यक्ष प्रवेशाच्या वेळी केली जाईल.

४) प्रवेशाच्या वेळी खालीलप्रमाणे प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक राहिल:

- विद्यापीठ पदवी गुणपत्रिका/ विद्यापीठ पदवी प्रमाणपत्र.
- जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र.
- मुळ स्थानांतरण प्रमाणपत्र/महाविदयालय सोडल्याचा दाखला ( Transfer Certificate/Leaving Certificate ).
- महाराष्ट्र रहिवासी प्रमाणपत्र.
- नॉन-क्रिमिलेयर प्रमाणपत्र, ३१ मार्च, २०२२ पर्यंत वैध असावे.

सदरील कागदपत्रांची पुर्तता न झाल्यास प्रवेश निश्चित होणार नाही.

५) ऑनलाईन अर्ज करण्यासाठी एस.आय.ए.सी. मुंबई व महाराष्ट्रातील इतर भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र यांचे संकेतस्थळ खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | केंद्रांचे नाव | संकेतस्थळ |
|---|---|---|
| १ | राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई | www.siac.org.in |
| २ | भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, नागपूर | www.preiasnagpur.in |
| ३ | भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, औरंगाबाद | www.preiasaurangabad.ac.in |
| ४ | भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, कोल्हापूर | www.pitckolhapur.org |
| ५ | भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक | www.iasnashik.org.in |
| ६ | भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, अमरावती | www.gpiasamt.org |

६) प्रवेशित उमेदवाराने प्रशिक्षण संस्थेकडून अथवा शासनाकडून घालून दिलेल्या नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील.

**७) आदर्श उत्तर तालिका, निकाल, गुणवत्ता यादी व प्रवेश यादी राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबईच्या संकेतस्थळांवर प्रकाशित करण्यात येईल. याबाबत कोणत्याही उमेदवाराला वैयक्तिक कळविण्यात येणार नाही.**

**८) प्रवेश परीक्षेचा ऑनलाईन अर्ज भरताना किंवा ऑनलाईन परीक्षा देतांना काही तांत्रिक अडचणी आल्यास उमेदवारांनी मोबाईल क्रमांक +९१८०९७०९४९४७ व ई-मेल support@siacexam.org वर संपर्क साधावा.**

९) ऑनलाईन परीक्षेच्या वेळी उमेदवाराला कोणतीही तांत्रिक अडचण आल्यास त्याकरीता राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई किंवा इतर कोणतेही प्रशिक्षण केंद्र जबाबदार राहणार नाही. तसेच कोणत्याही परिस्थितीत फेर परीक्षा घेतली जाणार नाही याची नोंद घेण्यात यावी.

१०) **प्रवेशासंदर्भात संबंधित केंद्रांच्या संचालकांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.**

११) परीक्षेचा अभ्यासक्रम सर्व संस्थेच्या संकेतस्थळांवर उपलब्ध आहे.

१२) प्रवेशित विदयार्थ्यांना केंद्रीय लोक सेवा आयोगाची नागरी सेवा पूर्व परीक्षा -२०२२ देणे बंधनकारक असेल.

**System Requirement for Online Exam**

(1) Personal Laptop, Desktop, Tab, or Smartphone
(2) Web Cam for establishing identity and monitoring.
(3) Internet Connection of at least **1mbps**
(4) Latest Google Chrome Internet Browser (pre-installed)

**If you are a MAC user, then follow the following instructions**

(1) Download www.googlechrome.dmg file
(2) Install this application by double-clicking on it.
(3) After installation move to google chrome of the application folder.

ठिकाण : मुंबई
दिनांक: ०९.१२.२०२१

सही/-
**संचालक**
राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई
( समन्वयक, सामाईक प्रवेश परीक्षा )